ज्ञान-विज्ञान विमुक्तये

विश्वविदयालय अनुदान आयोग द्वारा

अनुदानित

# लघु शोध प्रकल्प

## (Minor Research Project)

## 2011 - 2013

# ''महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासात बचत गटाचे योगदान विश्वविद्यालय अनुदान आयोगद्वारा अनुदानित''


–:: मुख्य अनुसंधानकर्ती ::–

डॉ. तनुजा एल् राजपूत

वाणिज्य विभाग

**दयानंद आर्य कन्या महाविद्यालय जरीपटका, नागपूर**

–:: मार्गदर्शन ::–

डॉ. वंदना खुशालानी



दयानंद आर्य कन्या महाविद्यालय

जरीपटका, नागपूर.

# महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात बचत गटाचे योगदान

प्रस्तावना :

मागील काही वर्षांच विचार केल्यास व्यवसायाबद्दलच्या व अर्थाजनाच्या उत्पन्नामध्ये खुप मोठा बदल झालेला दिसून येतो. जागतिकिकरण व उदारिकरणाच्या नवीन धोरणांमुळे कामाच्या अगणित क्षेत्रामधील संघाचे नविन विश्व खुले गेले आहे. दर दिवशी नौकरीच्या व व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध केल्या जात आहे. याचाच फायदा महिला वर्गाने घेण्यास सुरुवात केली आहे. मिळालेल्या संधीचे सोने महिलांनी केल्याचे आपल्याला त्यांच्या सर्वच क्षेत्रातील प्रगतीवरुन दिसून येते.

महिला बचत गटाची उद्दिष्टे :–

महिला बचत गटामध्ये समाविष्ट महिलांचे वैचारिक व मानसिक सामजंस्य घडवून आणुन त्यांना स्वबळावर उभे राहावयास मदत करणे हा बचत गटाचा प्रमुख हेतू असावा. सर्व साधारण महिला या लहानपणी बालकांवर तरुणपणी नवऱ्यावर व म्हातारपणी मुलांवर अवलंबुन असतात. अर्थाजन करणाऱ्या महिलांना ही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मानसिक गुलामगीरीचे दडपण सहन करीत पारतंत्र्यामध्ये राहावे लागले तरी अशा प्रकारच्या परावलंबी जगण्यामधून बाहेर पडण्यासाठी एक आशेचा किरण म्हणजे स्वयः सहायता बचत गट ज्यामुळे मानसिक आर्थिक स्वातंत्र्य उपयोगात महिला स्वतः चा विचार करु लागते.

महिला बचत गटाची वैशिष्टे :–

महिला बचत गट हा लोकशाही प्रणालीवर आधारीत असतो. अत्यंत अल्प बचतीमध्ये महिला/पुरुष गटामध्ये सभासदत्व मिळवु शकतात. स्त्रीच्या मनाला किंमत असण्यासाठी आर्थिक आणि सामाजिक पाठबळ असणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून शासनाने महत्वाची पाऊले उचलली व त्यातून बचत गटाचा उदय झाला. बचत गटाच्या चळवळीचे जनक नोबेल पुरस्कार विजेते डॉ. महम्मद युनुस यांनी महिलांमध्ये बचत गटाच्या माध्यमातून कमालीचा आत्मविश्वास निर्माण केला. आज जगभरात बचत गटाची चळवळ फोफावत गेली आहे. देशात एकूण 40 लाख बचत गट आहेत. त्यापैकी 3 लाख लोकांना कर्ज व व्याजापोटी 8 हजार कोटीची रक्कम शासनाने केली आहे.

महिला बचत गटाचे आर्थिक आणि सामाजिक अध्ययन :

बचत गटाला आर्थिक दृष्टया स्वयंपूर्ण बनवण्यासाठी विविध बँकांचा महत्वपूर्ण सहभाग आहे. महिला आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक दर्जा मिळण्यासाठी महिला बचत गटामार्फत विविध योजना राबविल्या जातात. नागपूर क्षेत्र हे राजकिय आणि ऐतिहासीक वारसा लाभलेले क्षेत्र आहे.

महिला बचत गटाच्या महिलांची वैयक्तिक आणि कौटुंबिक माहिती :

वैयक्तिक आणि कौटुंबिक माहितीचा अध्ययन विषयाचा काय संबंध आहे ? असा प्रश्न निर्माण होणे साहजिकच आहे. याचे उत्तर असे देता येईल की, कोणत्याही अध्ययन विषयाबाबत माहिती मिळवत असतांना, लोकांना सरळ त्या विषयाबाबत माहिती विचारली तर सर्वंच व्यक्ति माहिती प्रदान करतील किंवा नाही याबाबत शंका असू नये.

महिला बचत गटाच्या सदस्यांची सामाजिक माहिती :

आजच्या या महागाईच्या काळात बचत गट महत्वपर्ण भुमिका राबवत आहेत. बचत गटामूळे महिलांना स्वयः रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. बऱ्याचश्या महिला लघुउद्योग सुरु करुन आपल्या कुटुंबाच्या आर्थिक मदत करत आहेत. बचत गटामूळे महिलांना बचत करण्याची सवय लागली आहे.

निष्कर्ष :

1. जास्तीत जास्त 78.31 स्वयः सहायता बचत गटाच्या महिला सदस्य 25 ते 45 वर्ष वया दरम्यान आहे स्वयः सहासयता बचत गटाच्या महिला सदस्याच्या त्यांचा मध्यांक 32 वर्ष आहे.
2. महिला बचत गटाच्या जवळपास निम्म्या म्हणजे 48.33 सदस्य माध्यमिक शिक्षित आहेत तर त्या खालोखाल उच्च माध्यमिक शिक्षीत महिलांचे प्रमाण आहे.
3. महिला बचत गटाच्या जवळपास 45 म्हणजेच सर्वंच महिला विवाहित आहेत. याचाच अर्थं स्वयः सहायता बचत गट योजनेचा लाभ प्रामुख्याने विवाहित महिलाच घेतात.
4. महिला बचत गट योजनेचा लाभ घेणाऱ्या निम्म्या म्हणजे 50 महिला इतर मागास वर्गीय आहेत. तर जवळपास तेवढयाच महिला मागासवर्गीय आहेत.
5. सांख्यिकिय तथ्यावरुन असा निष्कर्ष निषतो की, प्रामुख्याने जास्तीत जास्त 73.33 गृहिणीच महिला बचत गट योजनेचा लाभ घेतात.